# ''क्रीडा क्षेत्रातील समस्या व उपाय''

डॉ. बाबासाहेब म. गोरे

प्राचार्य, अभिनव अध्यापक महाविद्यालय, लातूर

अधिष्ठाता, शिक्षणशास्त्र विद्याशाखा व व्यवस्थापन परिषद सदस्य, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

मानवी जीवनाच्या कला साहित्य संस्कृती विज्ञान या अंगांप्रमाणेच क्रीडा व शारीरीक शिक्षण हे एक मूलभूत अंग आहे. परंतु ते काहीसे दुर्लक्षित व उपेक्षित आहे हे म्हणणे गैर लागू होणार नाही. क्रीडा व शारीरीक शिक्षण हे शिक्षणाचे अविभाज्य भाग असल्याचा निर्वाळा कोठारी आयोग, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अशा आयोगांनी दिला असला तरी प्रत्यक्षात क्रीडांगण आणि क्रीडा सुविधा देणाऱ्या शाळा कॉलेजची संख्या अत्यल्प आहे. अर्थात याबाबत कोणा एका घटकावर दोषारोपण करणे उचित होणार नाही तर शिक्षक, पालक, शिक्षणसंस्था, शासन या सर्वांच्या सामुहिक जबाबदारीची जाणिव निर्माण करणे आवश्यक आहे.

नियमबध्द हालचाली , कृती यांच्याद्वारो मनोरंजनाचा एक प्रकार हेच क्रीडा व शारीरीक स्वरूप नाही. व्यक्तिमत्वाची बोधात्मक, भावात्मक, क्रियात्मक, सामाजिक अशा सर्वांगिण विकासाची ती प्रक्रिया आहे. म्हणूनच निरामय, समृध्द व संपन्न जीवनाचा पाया म्हणून शारीरीक शिक्षण व क्रीडा क्षेत्राचे महत्व आहे. परंतू क्रीडाक्षेत्राविषयीची अभिवृत्ती तयार करणारी प्रसारमाध्यमे व विविध सामाजिक घटकांची भूमिका विरोधाभसी स्वरूपाची असते. उदाःक्रिकेट सारख्या खेळाच्या तुलनेत भारतीय प्रसारमाध्यमात इतर खेळाना किंवा इतर क्षेत्रातील खेळाडूंना फारसे स्थान नाही. क्रिकेटपटूंचे चित्रपट क्षेत्राप्रमाणे ग्लॅमर आहे. याबाबी तशा अतिशोयोक्त आहेत. अर्थात क्रिकेटची लोकप्रियता,त्यातील खेळाडूंची कामगिरी निर्विवाद आहे. परंतु क्रिडा विषयक एकांगी स्वरूपाची अशी अभिवृत्ती व अभिरूची क्रीडा क्षेत्राला पूरक नाही एवढेच नमूद करावयाचे आहे.

शारीरिक शिक्षण व क्रीडा याबाबत सकारात्मक म्हणाव्या अशा बाबीही घडताहेत त्यांचीही आपण योग्य दखल घेतली पाहिजे. प्रदीर्घ काळापासून रेंगाळत असलेले महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण जाहिर झाले आहे. विद्यापीठांच्या शारीरिक शिक्षणाच्या विद्याशाखेतून विविध संशोधन परिषदा, कार्यशाळा, सेमीनार होत आहेत. यातून क्रीडा क्षेत्रातील संशोधनासाठी प्रेरक वातावरणी निर्मिती होत आहे.

शारीरिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात सुधारणा घडवून आणणे व गुणवत्ता उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे याबाबी विद्याशाखेच्या सक्रीयतेच्या निदर्शक आहेत. क्रीडा क्षेत्राचा दर्जा उंचावण्यासाठी या प्रकारची Academic बाजू हा महत्वाचा मुद्दा आहेच. पण जनसामान्यांची

क्रिडा विषयक आवड उन्नत करणे तेवढेच महत्वाचे आहे. या दोन्ही दृष्टीने काही महत्वाच्या बाबी आपल्यापुढे ठेवणे आवश्यक आहे.

**क्रीडा क्षेत्राकडे करिअरच्या दृष्टीने पाहणेः—**

सामान्यपणे सर्वच कुटुंबामधून मुलाने खेळणे म्हणजे वेळ वाया घालविणे होय आणि यशस्वी होण्यासाठी ही गोष्ट मारक आहे. या भूमिकेतून पाहिले जाते. परंतु क्रीडा क्षेत्र एक चांगले करिअर देवू शकते असा विश्वास फारच अत्यल्प पालकांकडे आहे. परंतू , काही पालक या प्रकारचे धाडस दाखवित आहेत व आपल्या मुलाने एखाद्या क्रीडाक्षेत्रात पुढे जावे यासाठी ते प्रयत्नशील आहेत. अर्थात हे महानगरातील निवडक असे चित्र आहे. ग्रामीण भागात जिद्द, धडाडी , शारीरिक क्षमता असणारे विद्यार्थी असले तरी क्रीडा क्षेत्राकडे करिअर म्हणून पाहावे अशा सामाजिक आर्थिक स्तरातून ते आलेले नसतात. परिणामतः आपल्याकडे उपलब्ध असणारे प्रचंड सामर्थ्य (Potential)निरूपयोगी होत आहे.

क्रीडा क्षेत्र करिअर घडवू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि त्यासारख्या योजना सुविधा देवून प्रोत्साहित ठेवणे आवश्यक आहे. क्रीडा क्षेत्राकडे करिअर म्हणून पाहण्याची वृत्ती आपण थोडया प्रमाणात विकसीत करू शकलो तर आपल्या कामगिरीवर त्याचे विधायक परिणाम दिसू शकतील.

**क्रीडा क्षेत्रातील पायाभूत सुविधांची कमतरताः—**

क्रीडा क्षेत्राला नेहमी त्रस्त पायाभूत सुविधांचा आहे. महाराष्ट्रातही मुंबई, पुणे, नागपूर वा तत्सम शहतरात ज्या प्रकारच्या पायाभूत सुविधा आहेत तशा सुविधांचा विशेषतः मराठवाडया सारख्या भागात अभाव प्रकर्षाने जाणवतो. विद्यापीठांशी संलग्नित असणारी ठराविक महाविद्यालये वगळली तर क्रीडा साहित्य अभावानेच आढळते. पुरेसे मैदान नसणे, जिम्नॅशिअम नसणे, क्रीडा साहित्य नसणे याबाबी सर्वसामान्य आहेत आणि दुर्देवाने सर्वमान्य ही आहेत म्हणून पायाभूत साधनसुविधांच्या विकासासाठी फारसे प्रयत्न होताना दिसत नाहीत.

अनेक महाविद्यालयातील क्रीडा व शारीरिक शिक्षण वार्षिक स्नेहसंमेलनातील क्रिकेट सामन्यांपुरतेच मर्यादीत आहे. इतर क्रीडा प्रकारांचे साहित्य व पुरेसे मैदान नसेल तर यापेक्षा वेगळी अपेक्षा कशी करता येईल. 'क्रीडा सुविधा वाढविणे' हे एक लक्ष्य मानून महाविद्यालये व शासन यांच्याकडून संयुक्त प्रयत्नांची गरज आहे. विविध क्रीडा संघटना आणि स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेतला पाहिजे. सहकार्य, समन्वय व सहभागाच्या तत्वांचा अवलंब करून उपलब्ध साधनसुविधांचे उपयोगिता मूल्य वाढविता येणे शक्य आहे.

**क्रीडा स्पर्धाचे आयोजन व अर्थकारणः—**

क्रीडा स्पर्धाचे आयोजन करताना त्यासाठी आर्थिक तरतूद उभी करणे हे काम कठिण स्वरूपाचे असते. अनुदानांबाबत शासनाची धोरणे बदलत असताना समकालिन परिस्थितीत क्रीडा

स्पर्धांचे आयोजन करणे अधिकच कठिण होवून जाते. म्हणून त्यासाठी प्रायोजक शोधणे अवघड असते. या प्रकारच्या आर्थिक बाबींची जुळवाजुळव करताना मूळ उत्साह राहत नाही लोकांच्या काही विपरीत प्रतिक्रियामुळे हळू हळू नैराश्याचे वातावरण तयार होते म्हणून क्रीडा स्पर्धाना आर्थिक आधार देण्याची भूमिका शासन व इतर संस्थांनी घेतल्यास क्रीडा स्पर्धाचे प्रमाण वाढेल परिणामी विविध क्रीडा प्रकाराविषयीची आवड निर्माण होण्यास मदत मिळेल.

**क्रीडा विषयक प्रशिक्षणाचा अभावः—**

क्रीडा क्षेत्रातील प्रशिक्षकांचा अभाव ही देखील एक गंभीर समस्या क्रीडा क्षेत्रापुढे आहे. यातही पुन्हा शहरीग्रामीण भागानुसार प्रश्नाचे स्वरूप बदलते. काही प्रसिध्द क्रीडा प्रकार सोडले तर इतर खेळांसाठीचे चांगले प्रशिक्षक भेटत नाहीत. प्रशिक्षक तयार करण्याची व्यवस्था नाही. दुसरा प्रश्न प्रशिक्षणाच्या खर्चाशी संबंधित आहे. क्रीडा प्रशिक्षणावर केला जाणारा खर्च ही एक प्रकारची risk असते. कारण क्रीडा क्षेत्रातील अर्थप्राप्तीचे भाकित करता येत नाही. म्हणून व्यक्तिगत स्तरावर प्रशिक्षण खर्च, यशाबाबतचा धोका आणि वेळेचा व्यय यासाठी मानसिकता तयार होत नाही व सामान्य परिस्थितीतील खेळाडूंना ते परवडणारे नसते म्हणून प्रशिक्षणाबाबतची उत्सुकता आढळत नाही.

प्रशिक्षणाचा अभाव टाळण्याच्या दृष्टीने पुरेशी सक्षम यंत्रणा कार्यरत करणे.प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थींना परवडू शकेल अशा आर्थिक तरतूदी करणे याबाबत लक्ष दिले गेले तर सामान्य स्तरातील सक्षम व कर्तत्ववान खेळाडू आपल्याला प्राप्त होवू शकतील.

**क्रीडा क्षेत्राचे व्यावसायीकरणः—**

प्रचलित जागतिकीकरण, खाजगीकरण या प्रक्रियांचा परिणाम व प्रभाव म्हणून क्रीडा क्षेत्राचे व्यावसायीकरण होत आहे. 20—20 matches किंवा क्रिकेटमध्ये आपल्याला हे व्यावसायीकरणचे चित्र दिसते. ही स्थिती क्रीडा—क्षेत्राला किती साधक—बाधक आहे याबाबत नेमके विश्लेषण करता येत नसले तरी त्यामुळे काही नव्या संधी निश्चितच तयार झाल्या आहेत. क्रीडा प्रकारांकडे करिअर म्हणून पाहता येणे त्यामुळेच शक्य झाले आहे.

**क्रीडा क्षेत्र आणि प्रसार माध्यमेः—**

प्रसार माध्यमे समाज मानस तयार करीत असतात म्हणून क्रीडा क्षेत्राचा विस्तार व विकास यात प्रसार माध्यमांची भूमिका महत्वाची आहे. त्यांनी केवळ क्रिकेट केंद्रित माहितीचे संप्रेषण करण्याचा मोह टाळून एकूणच क्रीडा विषयक अभिरूची विकसीत करण्यावर लक्ष दिले पाहिजे.

**क्रीडा व शारीरिक शिक्षणातील संशोधनेः—**

क्रीडा शिक्षण व शारीरिक शिक्षण यांना वैज्ञानिक आधार आहे म्हणून त्याबद्दलचे शास्त्रीय विवेचन सातत्याने आवश्यक आहे. या दृष्टीने जैविक शास्त्रे, औषधनिर्माण व वैद्यक शास्त्र या विद्याशाखांना जोडून होणारी आंतरविद्याशाखीय संशोधन क्रीडा क्षेत्रासाठी मार्गदर्शक आहेत.

प्राचीन भारतीय परंपरेतील योग व आयुर्वेद या ज्ञानशाखा क्रीडा व शारीरिक शिक्षणात महत्वाची भूमिका बजावत आहेत. सारांशाने, क्रिडा व शारीरिक शिक्षणाचे क्षेत्र विस्तारत आहे आणि या विस्ताराला संशोधनात्मक अधिष्ठानाची गरज आहे.

**क्रीडा क्षेत्रातील व्यक्तिंची प्रतिमाः–**

क्रीडा क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्ति या काही Celebreties नसतात. परंतू त्यांचे स्वैर वर्तन  या क्षेत्राची लोकांच्या मनातील प्रतिमा बिघडवू शकते. म्हणून सर्व स्तरातील खेळाडू, प्रशिक्षक यांनी आपली नैतिक भूमिका ओळखून जबाबदारीने वर्तन करणे आवश्यक आहे. अंमली पदार्थाचे सेवन वा व्यसनाधीनता यामुळे केवळ व्यक्तिगत होत नाही तर संबंध क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो.

**प्रशासनाची शिथलताः–**

केंद्र व राज्य सरकारची क्रीडा क्षेत्राशी संबंधीत प्राधिकरणे, संचलनालये यांच्या कामकाजाच्या पध्दतीतील काही त्रुटीमुळे अंमल बजावणीचा वेग मंदावतो. परिणामी अनेक चांगल्या योजना व सुविधांपासून खेळाडू वंचित राहतात.

क्रीडा विद्यापीठ, संग्रहालय, ग्रंथालय यांची शालेय स्तरापासून सर्व स्तरातील आवश्यकता राज्याच्या क्रीडा आचारसंहिता अशा अनेक बाबी या धोरणात पुरस्कृत केल्या आहेत. परंतू त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूचीः–**

**आलेगांवकर भा.ना.** – प्रगत क्रीडा मानसशास्त्र, फडके प्रकाशन , कोल्हापूर.

**कुलकर्णी के.वि.** – शैक्षणिक मानसशास्त्र

**पाठक पी.डी.** – शिक्षा मनोविज्ञान , विनोद पुस्तक मंदिर

**शिंदे एस. के.** – शारीरिक शिक्षण अध्यापन पध्दती

**भोला, संजय** – विविध खेळ व नियम, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.